# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 14.10.2026** **वार : बुधवार**

---

## ठळक बातम्या

1. बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यात गंगा नदीत बोट उलटल्याने झालेल्या दुर्घटनेत 13 जणांचा मृत्यू.
2. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराविषयक चर्चा योग्य दिशेने आणि अंतिम टप्प्यात; परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर.
3. बिमस्टेक सदस्य देशांच्या गृहमंत्र्यांच्या पहिल्या बैठकीचा काल नवी दिल्लीत समारोप, जाहीरनाम्यात सर्व प्रकारच्या दहशदवादाचा तीव्र शब्दांत निषेध.
4. डेन्मार्क ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या तन्वी शर्मा आणि किदाम्बी श्रीकांत यांचा संघर्षपूर्ण विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश.

## सविस्तर बातम्या

**बोट अपघात**

बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातील राघोपूर दियारा भागात काल रात्री गंगा नदीत बोट उलटल्याने झालेल्या दुर्घटनेत 13 जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये प्रामुख्याने अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. 7 जणांना वाचवण्यात यश आल असून त्यानं उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे . वैशालीच्या जिल्हाधिकारी वर्षा सिंह यांनी प्रसारमाध्यमांना सांगितल की, राघोपूर इथ गंगा नदीत बोटीतून 20 लोक प्रवास करत होते आणि ते एका भोजन समारंभासाठी जात होते.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या बोट दुर्घटनेतील जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केल आहे. पंतप्रधानांनी या दुर्घटनेतील प्रत्येक मृतांच्या नातेवाईकांना 2 लाख रुपये आणि प्रत्येक जखमी व्यक्तीसाठी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 4 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून आंध्र प्रदेशच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात असून आज संध्याकाळी त्या विजय वाडा इथ श्री कनक दुर्गा मंदिरात जाऊन दर्शन घेतील. उद्या, राष्ट्रपती विजयवाडा इथ 'राष्ट्रीय सरस मेळा 2026' च उद्घाटन करतील. हा मेळा केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय आणि आंध्र प्रदेश सरकार यांनी आयोजित केला असून 30 हून अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील स्वयंसहायता गटांच्या दीड हजाराहून अधिक महिला त्यात सहभागी होत आहेत. या मेळ्यांत विविध राज्यातील पारंपरिक हस्तकला उत्पादने आणि प्रादेशिक खाद्यपदार्थांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे .

**मोदी-कार्नी चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्यात काल द्विपक्षीय संबंधांबद्दल दूरध्वनीवरून चर्चा झाली. दोन्ही देशांदरम्यान 'धोरणात्मक भागीदारी'च्या प्रमुख क्षेत्रांमध्ये ठोस निष्पन्न साध्य करण्याच्या दिशेने काम करण्यावर यावेळी

दोन्ही नेत्यानी सहमती दर्शवली. यामध्ये व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान, सुरक्षा आणि परस्पर जनसंपर्क यांचा समावेश आहे.भारत आणि कॅनडा मिळून अधिक स्थिर आणि समृद्ध जगाच्या निर्मितीसाठी योगदान देत आहेत, अस पंतप्रधान मोदींनी आपल्या समाजमध्यमावरील संदेशात म्हंटल आहे.

दरम्यान, कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद काल संध्याकाळी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्लीत दाखल झाल्या. या दौऱ्यादरम्यान त्या आज परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि कौशल्य विकास उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांची भेट घेणार आहेत.

**भारत-अमेरिका करार**

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराविषयक चर्चा योग्य दिशेने जात असून, सध्या या कराराला अंतिम स्वरूप दिलं जात असल्याची माहिती परराष्ट्रव्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी दिली आहे. ते काल नवी दिल्लीत 'ब्लुमबर्ग इकॉनॉमी फोरम'मध्ये बोलत होते. भारत आणि अमेरिकेच्या वाणिज्य मंत्र्यांमध्ये या कराराबाबत बोलणी सुरु असून, व्यापार कराराबाबतच्या वाटाघाटींची प्रक्रिया पुढच्या टप्प्यावर पोहोचली असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

इथून पुढे प्रत्येक देशाला अमेरिकेसोबतचे आपले संबंध नव्याने जुळवून घ्यावे लागणार असून, त्याबाबत फेरविचार करावा लागणार आहे असं जयशंकर यांनी यावेळी एका प्रश्नाला उत्तर देताना नमूद केलं.

**बिमस्टेक-जाहीरनामा**

बिमस्टेक सदस्य देशांच्या गृहमंत्र्यांच्या पहिल्या बैठकीचा काल नवी दिल्लीत समारोप झाला. यावेळी सदस्य देशांच्या वतीने नवी दिल्ली जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. यामध्ये बिमस्टेक राष्ट्रांनी, सर्व प्रकारच्या दहशदवादाचा तीव्र शब्दांत निषेध केला.

दहशतवाद आणि दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या हिंसक आणि अतिरेकी वृत्तीचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची सनद आणि आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार सर्वसमावेशक आणि शाश्वत मार्गाने, लढून त्यांचं समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार या जाहीरनाम्यात व्यक्त करण्यात आला. तसच यासाठी बिमस्टेक देशांतर्गत प्रादेशिक सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी असलेल्या कटिबद्धतेचा या जाहीरनाम्यात पुनरुच्चार करण्यात आला आहे.

**परिषद**

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने आजपासून नवी दिल्ली इथ 'बृहत्तर भारत-जगभरातील भारताचे सांस्कृतिक संबंध' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच आयोजन करण्यात आल आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत 50 देशांतील प्रतिनिधी, राजदूत आणि अभ्यासक एकत्र येऊन भारताचे उर्वरित जगाशी असलेले ऐतिहासिक आणि समकालीन सांस्कृतिक संबंध यांवर चर्चा करतील. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी एका विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे उपस्थितांना संबोधित करणार आहेत .

**युपीआय एमडीआर**

युपीआय व्यवहारांवरचं एमडीआर शुल्क दिवाळीनंतर लागू होणार आहे. भारताच्या राष्ट्रीय देयक महामंडळानं समाज माध्यमांवरच्या संदेशाद्वारे ही माहिती दिली आहे. आगामी सणांचा काळ लक्षात घेऊन युपीआय आणि सेवा सुकाणू समितीनं हा निर्णय घेतला असल्याचं या संदेशात नमूद करण्यात आलं आहे.

**मुरुगन-राजीनामा**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरूगन यांनी काल आपल्या मंत्रीपदाचा तसंच राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. अतिशय सामान्य कौटुंबिक पार्श्वभूमी ते केंद्रीय मंत्रिमंडळात सहभाग हा प्रवास खूपच समाधानकारक होता. 2029 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी त्याच तळागाळातील कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभं राहून तामिळनाडूत भाजपची स्थिति

भक्कम करण्यासाठी पूर्ण वेळ समर्पित करण्याची आपली इच्छा आहे. त्यामुळेच, राज्यमंत्रीपदाच्या जबाबदाऱ्यांमधून आणि राज्यसभेच्या सदस्यत्वातून मुक्त होण्याची परवानगी आपल्याला द्यावी अशी विनंती मुरूगन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना राजीनामापत्रात केली आहे.

**<u>दुर्गा-पूजा</u>**

पश्चिम बंगालमध्ये नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर,कोलकता इथं दुर्गापूजेची तयारी उत्साहात सुरू आहे. रंगीबेरंगी पूजा मंडप, विद्युत रोषणाई आणि संगीत यांनी वातावरणात जल्लोष निर्माण केला आहे. या उत्सवी वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी आणि खरेदीसाठी नागरिकांची रस्त्यांवर गर्दी झाल्याचं दिसून येत आहे. प्रशासनानंही वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्था चोख ठेवली आहे.

**<u>इबोला-प्रसार</u>**

दक्षिण आफ्रिकेत काँगोमध्ये इबोला रोगाचा प्रसार झपाट्याने होत असून या उद्रेकात आता बाधित रुग्णांची संख्या 9,000 च्या वर गेली आहे तर मृतांचा आकडा 4,300 पेक्षा जास्त झाला आहे; सात प्रांतांमध्ये पसरलेला हा उद्रेक रोखण्यासाठी आरोग्य यंत्रणेला मोठी कसरत करावी लागत आहे.

सामुदायिक संसर्ग हा आरोग्य यंत्रणेसाठी चिंतेचा असून ताज्या अहवालात 88 नवीन रुग्णांची नोंद झाली आहे ,हा उद्रेक अधिकाधिक समुदायांमध्ये पसरत असल्याने नवीन 'हॉटस्पॉट्स' तयार होत असून आता सात प्रांतांमधील 65 आरोग्य विभाग याच्या विळख्यात आले आहेत.

गेल्या आठवड्यात, युगांडानंतर केनिया हा असा दुसरा देश ठरला जिथे काँगोमधून आलेला इबोलाचा रुग्ण आढळला; यामुळे हा विषाणू सीमा ओलांडून पसरण्याबाबतची चिंता अधिकच वाढली आहे

**<u>बॅडमिंटन</u>**

डेन्मार्क ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताची तन्वी शर्मा आणि किदाम्बी श्रीकांत यांनी आपल्या सलामीच्या सामन्यांमध्ये संघर्षपूर्ण विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. तन्वीने एका रोमांचक लढतीत जपानच्या नात्सुकी निदैराचा 2-1 ने पराभव केला. आता तिचा सामना जर्मनीची खेळाडू इव्हॉन ली हिच्याशी होईल. किदाम्बी श्रीकांतने फ्रान्सचा बॅडमिंटनपटू अर्नो मेर्कलेचा 2-0 ने पराभव केला आणि आता त्याचा सामना फ्रान्सचाच दुसरा बॅडमिंटनपटू ॲलेक्स लॅनिएर याच्याशी होईल.

दरम्यान, भारताची दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन हे पराभूत झाल्याने स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

पुरुष क्रिकेटमध्ये, भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यात आज हैदराबाद इथ चौथा टी-२० सामना खेळला जाणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी 7 वाजता सुरू होईल.गेल्या रविवारी इंदूरमध्ये झालेल्या तिसऱ्या टी-20 सामन्यात भारताने वेस्ट इंडीजचा 14 धावांनी पराभव केल्यानंतर, या पाच सामन्यांच्या मालिकेत भारत 2-1 ने आघाडीवर आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.